ARTHA (Commercial Weekly) Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २६ | पुणें, बुधवार तारीख २४ ऑगस्ट, १९६० | अंक ३३

## विविध माहिती

**वाचनालयासाठीं इमारत**—विदर्भ साहित्यसंघातर्फे बांधण्यांत येणाऱ्या शिवाजी वाचनालयाचा पायाभरणी-समारंभ नागपूरचे एक उद्योगपति श्री. पी. बी. काळे ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. हें वाचनालय लोकसभेच्या दिवंगत सभासद श्रीमती अनुसूयाबाई काळे ह्यांच्या स्मरणार्थ बांधण्यांत येणार आहे. वाचनालयासाठी त्यांचे पति श्रीयुत पी. बी. काळे ह्यांनीं २३ हजार रुपयांची देणगी दिली आहे.

**कच्छमध्यें खव्याचा कारखाना**—कच्छमध्यें बन्नी ह्या विभागांत खवा तयार करण्याचा एक कारखाना लवकरच उभारण्यांत येणार आहे. ह्या भागांतील गवळ्यांची आर्थिक स्थिति सुधारण्याचा हा प्रयत्न आहे. कारखान्यासाठी २९ लाख रुपये खर्च येईल. कच्छमध्यें सुरतगडप्रमाणें यांत्रिक शेतीची एक वसाहतहि स्थापन करण्यांत येणार आहे.

**व्यापाऱ्यांवर गैरविश्वास**—व्यापारीवर्गासंबंधीं जे कायदे-विधिमंडळांतून मांडले जातात ते अनुभवी सरकारी अधिकारी व व्यापारी ह्यांचा सल्ला घेऊन तयार करण्यांत यावेत. सध्यां व्यापाऱ्यांना चोर व गुन्हेगार असल्याप्रमाणें वागणूक देण्यांत येते, असे विचार श्री. राजगोपालाचारी ह्यांनीं व्यक्त केले आहेत.

**रसायनांची निर्यात**—भारताचे उद्योगमंत्री श्री. मनुभाई शहा कलकत्ता येथें एका प्रसंगीं म्हणाले, कीं भारत आतां कांहीं रसायनें व रासायनिक पदार्थ ह्यांची निर्यात करूं शकेल. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या कालांत रासायनिक पदार्थांची आयात खूप कमी करण्यांत आली होती. आतां बरेच रासायनिक पदार्थ गरजेपेक्षा अधिक तयार होत आहेत.

**हातमागाच्या वाढत्या किंमती**—दिल्लीमधील कापड-बाजारांतील हातमागाच्या कापडाच्या किंमती गेल्या ८ महिन्यांत १५ ते २० टक्क्यांनीं वाढल्या आहेत आणि त्या अजूनहि चढण्याचा संभव आहे. चढत्या किंमतीमुळें पानिपत येथील ८०० विणकरांचे माग बंद पडले आहेत. इतरहि अनेक ठिकाणच्या हातमागाच्या केंद्रांना हा धक्का जाणवला आहे.

**अणुकिरणांचा शेतीस उपयोग**—भारताच्या अणुशक्ती-मंडळानें अणुविच्छेदनामुळें निर्माण होणाऱ्या किरणांचा धान्याच्या वाढीसाठी उपयोग करता येईल किंवा काय ह्यासंबंधीं १९५७ पासून प्रयोग चालविले आहेत. दक्षिण भारतांत पेरण्यांत येणाऱ्या एका भातरोपांकडे ह्या बाबतींत विशेष लक्ष देण्यांत आलें आहे.

**खोट्या पासपोर्टांचा उपयोग**—खोट्या पासपोर्टांचा उपयोग करून सुमारें २०,००० हिंदी नागरिकांनीं ब्रिटनमध्यें प्रवेश मिळविला अशी माहिती श्रीमती लक्ष्मी मेनन यांनीं सांगितली होती. तथापि ह्या माहितीला ब्रिटनच्या गृहखात्याकडून पुष्टी मिळालेली नाहीं. कांहीं लोक सलाशी म्हणून ब्रिटनला गेले होते.

**सहकारी संस्थांना सुताचा पुरवठा**—मद्रासमधील सुताच्या गिरण्यांनीं आपल्या उत्पादनापैकीं ५० टक्के उत्पादन विणकरांच्या सहकारी संस्थांसाठी राखून ठेवण्याचें ठरविलें आहे बाकीचें उत्पादन गिरण्या आपआपल्या दुकानांमार्फत वाटणार आहेत. गिरण्यांनीं सुताच्या किंमतीहि कमी केल्या आहेत.

**पाकिस्तानांत तेलाचा शोध**—पाकिस्तानांतील भूमिगत तेलाचा व खनिजांचा शोध करण्यासाठी पाकिस्तानचें सरकार रशिआशीं बोलणीं सुरू करणार आहे. गेलीं दहा वर्षें सात पाश्चिमात्य कंपन्या संशोधनाचें काम करीत आहेत. पण त्यांना फारसें यश आलेलें नाहीं. तीन कंपन्यांनीं आतां हें काम सोडून दिलें आहे.

**यमुनेच्या पात्रांत तेल**—आग्र्याजवळ बालकेश्वर ह्या ठिकाणीं यमुना नदीच्या पात्रांत तेल सांपडण्याचा संभव आहे. ह्या ठिकाणच्या पात्रांतील कांहीं चिखल तज्ज्ञांनीं डेहराडून येथील संशोधन शाळेंत पाठविला आहे. येथील पाण्याच्या पृष्ठभागावर तेलाचा तवंग पसरल्याचें प्रथम एका साधूच्या लक्षांत आलें.

**अणुशक्तीवरील वीज-केंद्र**—महाराष्ट्रांतील ठाणें जिल्ह्यांत तारापूर गांवाजवळ भारतामधील पहिलें, अणुशक्तीच्या साह्यानें वीज उत्पन्न करणारें केंद्र उभारण्यांत येणार आहे. तारापूर हें गांव गुजरातच्या सीमेपासून २५ मैलांवर आहे. विजेची वांटणी दोन्ही राज्यांत सम प्रमाणांत करण्यांत येणार आहे.

श्री. वा. काळे ह्यांच्या पुस्तकांचे गुजराती अनुवाद

सुखी जीवननी पगदंडी (त्रिसरी आवृत्ति) [ कण आणि क्षण ]

सदाचारने पगले (दुसरी आवृत्ति) [ पुढे पाऊल ]

मधुमालती (छापत आहे) [ तुमचें स्थान कोणतें ]

## लिक्विडेशनमध्यें गेलेल्या हिंदी व्यापारी बँका
### १९३९–५९

| राज्य | बँकांची संख्या | भांडवल | | | ठेवी |
|---|---|---|---|---|---|
| | | अधिकृत | खपलेलें | वसूल | |
| **१९३९ मध्यें** | | रु. | रु. | रु. | रु. |
| आंध्रप्रदेश ... ... | २ | १,९९,९९० | ५४,८२८ | ४०,२२१ | ... |
| मुंबई ... ... | १ | २०,००,००० | १,०७,६०० | ... | ... |
| केरळ ... ... | १० | ३२,२०,००० | ९,८५,८८० | ४,२६,७२४ | ३,५०,९४९ |
| मद्रास ... ... | ७ | १०,१०,००० | ५,८५,३६५ | ४,९३,९६५ | १,३९,५३५ |
| म्हैसूर ... ... | ४ | १२,४०,००० | २,२०,२३० | २,०४,३५५ | ७४४ |
| त्रिपुरा ... ... | १ | ५०,००,००० | ३२,६८,४०० | १९,८४,५०० | ३,४५,००० |
| उत्तर प्रदेश ... ... | ७ | ३५,३०,००० | २२,०२,३५० | ११,४५,४३० | १,२८,३३,३६८ |
| प. बंगाल ... ... | ११ | ४३,००,००० | ७,२०,०१६ | ६,१७,६४३ | १४,५५,५४६ |
| एकूण | ४३ | २,०४,९९,९९० | ८१,४४,६६९ | ४९,१२,८८८ | १,५१,२५,१४२ |
| **अविभक्त भारत** | | | | | |
| १९३९ ... ... | ११७ | २,७४,३४,९४० | ५३,०४,७७३ | २४,९१,२९८ | ... |
| १९४० ... ... | १०७ | ७,३४,३०,००० | ४३,९१,९७७ | २३,९०,३६३ | ... |
| १९४१ ... ... | ९४ | १,४९,६४,९९० | २९,६८,४३५ | १२,३८,७८२ | ... |
| १९४२ ... ... | ५० | ६,७६,६०,००० | ३३,५८,७४५ | १४,०६,७४६ | ... |
| १९४३ ... ... | ५९ | ४,०३,५०,४८० | १५,५४,४७० | ७,४८,९६७ | ... |
| १९४४ ... ... | २८ | ८१,१०,००० | १५,१०,४०८ | ६,२७,२६० | ... |
| १९४५ ... ... | २७ | ८१,३१,५०० | ८,५२,२१० | ४,७४,०२५ | ... |
| १९४६ ... ... | २६ | २,५०,४५,००० | ११,३९,४७४ | ९,२२,४४१ | ... |
| १९४७ ... ... | ३८ | ७,४३,३९,००० | १,००,१५,६५२ | ८२,८३,८४६ | ... |
| **भारत** | | | | | |
| १९४८ ... ... | ४५ | १२,३७,५९,९०० | २,४८,२०,१८८ | १,८२,६८,९०६ | ... |
| १९४९ ... ... | ५५ | १०,७०,५८,५७२ | १,९४,१६,७३८ | १,३०,६३,९२१ | ... |
| १९५० ... ... | ४५ | ७,११,६०,००० | १,७७,५४,२६८ | १,२८,४९,५२२ | ... |
| १९५१ ... ... | ६० | ९,१७,५२,७२७ | ९२,४३,४२६ | ६२,०७,३०५ | ... |
| १९५२ ... ... | ३१ | १,३१,०९,८०० | २५,०७,८९२ | १५,७९,६६७ | ... |
| १९५३ ... ... | ३१ | ४,९२,८७,००० | १,६३,३५,५५० | १,१३,५७,९१७ | ... |
| १९५४ ... ... | २७ | १,८८,४४,२८६ | ७७,३०,२६४ | ४७,५०,९७१ | ... |
| १९५५ ... ... | २९ | १,५२,३१,५०० | ६२,८८,२३४ | ४६,४५,२९६ | ... |
| १९५६ ... ... | १९ | ७२,४४,९१४ | २२,७४,५४६ | १९,७६,७४५ | ५४,६५,५१७ |
| १९५७ ... ... | २५ | ८९,७५,००० | ३९,४५,३१२ | २७,५५,९७४ | २२,७९,१८७ |
| १९५८ ... ... | २३ | २,४२,४४,२८६ | ५१,१३,७१८ | ३२,९३,६४१ | १,७४,४७,५६० |
| १९५९ ... ... | ४३ | २,०४,९९,९९० | ८१,४४,६६९ | ४९,१२,८८८ | १,५१,२५,१४२ |

**मौंट एव्हरेस्टच्या मोहिमेचा खर्च**—भारतामधील गिर्यारोहकांनीं मौंट एव्हरेस्ट ह्या हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर चढण्याची मोहीम काढली होती. ह्या मोहिमेसाठी मध्यवर्ती सरकारनें ६,४६,१९५ रुपये मंजूर केले होते. त्यापैकी ४६,१८५ रुपये शिखरावर चढणाऱ्या आरोहकांच्या शिक्षणासाठी मंजूर झाले होते.

**रेल्वेच्या डब्यांची निर्यात**—रेल्वेचे प्रवासी डबे, मालवाहतुकाचे डबे व इतर सामान सीलोनमध्यें निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठी भारताचें एक प्रतिनिधीमंडळ सीलोनला गेलें आहे. सीलोनच्या रेल्वेअधिकाऱ्यांशीं चर्चा करून सीलोनला लागणारा माल भारताला पुरवतां येईल कीं नाहीं, ह्याची पहाणी ते करणार आहे.

**गुजरातच्या राजधानीची जागा**—गुजरात राज्याची नवी राजधानी अहमदाबादजवळ वसविण्याचें घाटत आहे. परंतु ह्या बाबतींत राज्य सरकारला मध्यवर्ती सरकारनें दुसरी जागा निवडण्याचा सल्ला दिला आहे. संकल्पित जागीं तेल सांपडण्याचा संभव असल्यामुळें ह्या सल्ला देण्यांत आला आहे. ह्या जागेची भूस्तरविषयक पहाणी नुकतीच करण्यांत आली आहे.

**छोट्या मोटारगाड्यांची निर्मिति**—भारतांत छोट्या मोटारगाड्या तयार करण्याच्या दृष्टीनें एक सोयीस्कर नमुना ठरविण्यासाठी भारत सरकारनें तीन जणांची एक कमिटी नेमण्याचें ठरविलें आहे. अशा मोटारीची उत्पादनाची किंमत ५,००० रुपयांपेक्षा अधिक असूं नये व ती गिऱ्हाइकाला ६,५०० रुपयांना विकतां यावी अशी सरकारची अपेक्षा आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २४ ऑगस्ट, १९६०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## लायसेन्सवाल्या, शिड्यूल्ड आणि बिगर-शिड्यूल्ड बँका

शिड्यूल्ड बँका आणि लायसेन्स दिलेल्या बँका ह्यांच्यांतील फरक राज्यसभेंत महसूलमंत्रि श्री. गोपाल रेड्डी ह्यांनीं समजावून सांगितला. बँकेला लायसेन्स दिलेला असला, म्हणजेच तिच्या सुदृढतेची रिझर्व्ह बँकेची ग्वाही समजावी, असें ते म्हणाले. सर्व शिड्यूल्ड बँकांना लायसेन्स मिळालेला नाहीं आणि पलाई सेंट्रल बँकेलाहि लायसेन्स देण्यांत आलेला नव्हता. प्रत्येकच बँकेनें ( शिड्यूल्ड व बिगर शिड्यूल्ड ) रिझर्व्ह बँकेकडे लायसेन्ससाठी अर्ज केलेला आहे. पण, रिझर्व्ह बँक कोणताच अर्ज तात्काळ नामंजूर करीत नाहीं; कारण त्यामुळें ती बँक लागलीच बंद पडेल. बँकेच्या कारभारावर रिझर्व्ह बँक लक्ष ठेवते आणि त्या बँकेची परिस्थिति उत्कृष्ट आढळली म्हणजेच तिला लायसेन्स देते. पलाई बँकेला लायसेन्स दिलेला नव्हता, पण ही गोष्ट जनतेला कळण्याचा कांहींच मार्ग नव्हता. कारण, लायसेन्स दिलेल्या बँकांची यादी रिझर्व्ह बँक प्रसिद्ध करीत नाहीं; शिड्यूल्ड बँकांची मात्र करते. आपल्याला लायसेन्स मिळालेला आहे, ह्याची जाहिरात लायसेनदार बँकांनीं करावयाची नसते. पलाई बँकेसारखी ३३ वर्षांपूर्वी स्थापन झालेली, २५ लक्ष रु. वसूल भांडवलाची, १० कोटी रु. ठेवींची आणि २५ शाखा असलेली शिड्यूल्ड बँक लायसेन्सला अद्याप अपात्र होती, ही गोष्ट ती बँक बुडाल्यानंतर प्रकट करण्यांत आली आहे.

सध्यां देशांतील ६६ बँकांना रिझर्व्ह बँकेनें लायसेन्स दिलेला आहे, १३१ बँकांना नाकारलेला आहे आणि २९९ बँकांच्या अर्जांचा अद्याप विचार चालू आहे. लायसेन्स न दिलेल्या बँकांची संख्या मोठी असली, तरी सुमारें ९०% ठेवी लायसेन्स असलेल्या बँकांकडेच आहेत, हें हिंदी बँकिंगच्या सुस्थितीचें निदर्शक निश्चितच आहे. एखाद्या बँकेच्या लायसेन्सचा अर्ज अद्याप निकालांत काढलेला नाहीं ह्याचा कुणी विपरीत अर्थ करूं नये, एखाद्या बँकेला लायसेन्स मिळालेला नाहीं म्हणूनच केवळ ती कमकुवत आहे असा बभ्रा होऊं नये, तिला सुधारण्यास वाव द्यावा आणि तिला लायसेन्स मिळावा ह्या दृष्टीनें तिच्यांत सुधारणा घडवून आणावी, असा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न असतो. लायसेन्स नाकारण्याचे बाबतींत हा सावधपणा बहुसंख्य बँकांचे बाबतींत हितकारक ठरला आहे. लायसेन्स नाकारणें सोपें आहे, पण त्याच्या दुष्परिणामांचाहि विचार रिझर्व्ह बँकेनें करून धोरण आखलेलें आहे. सामान्य लोकांना ह्याची माहिती नसल्यामुळें शिड्यूल्ड बँक म्हणजे मजबुतीची गॅरंटी असें ते समजून चालतात; कांहीं बिगर-शिड्यूल्ड बँकाहि शिड्यूल्ड बँकापेक्षा आकारानें लहान पण अधिक मजबूत असूं शकतात, हें विसरलें जातें. पलाई बँकेच्या निमित्तानें ह्या गोष्टींवर आतां प्रकाश पडला आहे.

ज्या बँकेचें वसूल भांडवल अधिक रिझर्व्ह ५ लक्ष रुपयांपेक्षा ज्यास्त आहे, तिला शिड्यूल्ड बँकांच्या यादींत दाखल केलें जातें. ठेवीदारांच्या दृष्टीनें, अशी बँक बंद पडली, तर सर्व ठेवी परत करता येऊन पुन: किमान ५ लक्ष रु. शिल्लक उरायला हवेत. ही एका दृष्टीनें रिझर्व्ह बँकेची गॅरंटीच होय. पण वस्तुत: तसें घडत नाहीं आणि शिड्यूल्ड बँकेला बिगर-शिड्यूल्ड करण्याची घाई रिझर्व्ह बँक करीत नाहीं. अजून ४५ शिड्यूल्ड बँका लायसेन्सविना कारभार करीत आहेत व त्या हळुहळु सुधारत आहेत, हें त्याचेंच निदर्शक आहे.

---

## भारताच्या आर्थिक प्रकृतीची मीमांसा

भारताचे अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई अलीकडेच पश्चिम जर्मनीला भेट देऊन आले. त्यावेळीं पश्चिम जर्मनीचे अर्थमंत्री डॉ. एरहार्ड ह्यांच्याशीं त्यांनीं भारताला मिळावयाच्या आर्थिक साह्याविषयीं बोलणीं केलीं. डॉ. एरहार्ड ह्यांनीं एका जर्मन वृत्तपत्रांत ह्यासंबंधीं लेख लिहिला आहे. त्यांत ते म्हणतात कीं, भारताला लागणाऱ्या मदतीपैकी कांहीं भाग तरी कर्ज देण्याशिवाय गत्यंतरच नाहीं. हें कर्ज दीर्घ मुदतीचें असलें पाहिजे. त्याचप्रमाणें, हें कर्ज मामुली व्यापारी पद्धतीच्या अटींवर देऊनहि भागणार नाहीं. भारताला देण्यांत येणाऱ्या मालाबद्दल त्याला ताबडतोब किंमत देतां येणार नाहीं. त्यामुळें उभयतां देशांत होणाऱ्या व्यापारांत मंदी येणें अपरिहार्य आहे. १९५८ सालीं पश्चिम जर्मनीनें भारताकडून २१ कोटी रुपयांचा माल घेतला व भारताला १३२ कोटी रुपयांचा माल पुरविला. १९५९ सालीं हेच आंकडे अनुक्रमें २०.८ कोटी रुपये १०५ कोटी रुपये असे होते. आर्थिक विकास चालू असलेल्या देशांत भारत हा सर्वांत मोठा देश आहे. अर्थातच त्याला मिळेल तिकडून भांडवल घेण्याची जरूरीच आहे. अलीकडे भारत आपल्या कच्च्या मालाचा पक्का माल स्वत:च करूं लागला आहे. त्यामुळें आयात केलेल्या मालाचा मोबदला ह्या कच्च्या मालाच्या रूपानें देतां येणें भारताला दीर्घ काळ शक्य होणार नाहीं. भारताचें औद्योगीकरण होऊन अनेक प्रकारचा पक्का माल जेव्हां भारतांत तयार होऊं लागेल, त्या वेळेपासूनच त्याला आवश्यक आयातीचा मोबदला देतां येऊं लागेल. तोंपर्यंत भारताला मिळेल तेथून भांडवल घ्यावें लागेल.

---

## बँकांतील ठेवींवरील व्याजाचे दर आणखी उतरणार

इंडियन बँक्स असोसिएशन व एक्सचेंज बँक्स असोसिएशन ह्यांनीं ठेवींवरील व्याजाचे दर आणखी उतरण्यांत यावेत, असें सुचविलें आहे. तीन महिने व त्यापेक्षा जास्त मुदतीच्या ठेवींवरील कमाल दर ( ३½% ) मात्र कायम राहील. नव्या योजनेप्रमाणें, ७ दिवसांच्या नोटिशीच्या ठेवींवरील कमाल दर ३¼% चा ३% केला जाईल आणि तीन महिन्यांपेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवरील कमाल दर ३¼% चा ३⅛% केला जाईल. ५ कोटी रु. पेक्षा कमी ठेवी असणाऱ्या बँकांना वरील कमाल दरापेक्षा ⅛% जास्त दर आकारतां येईल. ३८ बँकांनीं व्याजाच्या दराबाबत करार केलेला आहे, त्यापैकी बहुसंख्य बँकांनीं नव्या दरांस संमति दिली आहे.

## पीक–कर्ज–मूल्यमापन समितीचा अहवाल

(भाषांतरकार : प्रा. श्री. मं. भांडारे. प्रकाशक : मुंबई राज्य सहकारी संघ. किं. ५ रु.)

शेतकऱ्यांना पतपुरवठा करण्याचें एक नवें धोरण मुंबई राज्य सहकारी बँकेनें १९५० मध्यें स्वीकारलें. शेतकऱ्याच्या जमिनीच्या मालकीच्या आधारावर त्याला कर्जे न देतां, तीं पिकाच्या उत्पादनाविषयींच्या त्याच्या गरजांच्या आधारावर द्यावींत, असें त्या धोरणाचें स्वरूप होतें. कर्ज देण्याच्या पद्धतींत लवचिकपणा आणि वक्तशीरपणा आणण्याचा, आणि पिकाच्या उत्पादनासाठी पुरेसें कर्ज उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न त्यांत केला होता; मग ते शेतकरी जमीन–मालक असोत वा कुळें असोत. शक्य तों सहकारी संस्थांच्या द्वारां पिकांची विक्री करून त्यांतून त्यांनीं परतफेड करावी अशी अपेक्षा होती. सहकारी चळवळीच्या द्वारें एकाच एकजिन्सी पतपुरवठा व्यवस्थेंत सर्व कर्जपात्र शेतकऱ्यांना आणावयाचें, असा तो प्रयत्न होता. ह्या कामाच्या व्याप्तीमुळें ज्या मोठ्या आर्थिक जबाबदाऱ्या निर्माण होतात त्या लक्षांत घेऊन सरकारनें भाग–भांडवलांत आपली भर घालण्याचें मान्य केलें.

वरील व्यवस्थेच्या कार्याचें समालोचन करण्याची वेळ आतां आलेली आहे असें १९५६ मध्यें बँकेच्या संचालक–मंडळाला वाटलें आणि तिनें मुंबई राज्य सहकारी बँकेच्या कार्यक्षेत्रामधल्या पीक–कर्ज–व्यवस्थेच्या कामाचें मूल्यमापन करण्यासाठी एक समिति नेमली. तिचे प्रा. द. गो. कर्वे हे अध्यक्ष होते. ह्या समितीचा अहवाल बँकेनें १९५८ मध्यें प्रसिद्ध केला. त्याचें हें मराठी भाषांतर मुंबई राज्य सहकारी संघानें आतां प्रसिद्ध केलें आहे. त्यानें ग्रामीण पतविषयक वाङ्मयांत मोलाची भर घातली आहे.

### धोरणविषयक पत्रक

कर्जपात्र शेतकऱ्यांना त्यांच्या हंगामी शेतकी व बाजार–विक्री कामांसाठी संस्थांतूनच पत–पुरवठा करण्याची जबाबदारी मध्यवर्ती पतसंस्थांनीं 'अंगीकृत' जबाबदारी म्हणून घ्यावयाला असलेली पार्श्वभूमि लक्षांत घेऊन नव्या योजनेंत अंतर्भूत असलेल्या, सर्व-साधारणपणें सहकारी आणि विशेषतः मध्यवर्ती संस्थांना द्यावयाचें एक धोरणविषयक सूचनापत्रक प्रा. ध. रा. गाडगीळ ह्यांच्या सल्ल्यानें संचालक मंडळानें तयार केलें. ह्या व्यवस्थेच्या मूलतत्त्वांचा त्यांत अंतर्भाव होता, व पिकें काढण्यासाठीं शेतकऱ्यांना द्यावयाच्या पीक-कर्जाच्या कार्य-पद्धतीची त्यांत मांडणी केलेली होती. कर्ज-पात्र शेतकऱ्याबद्दल सहकारी चळवळीचीं सर्वसाधारण कर्तव्यें लक्षांत घेऊन एका एकसंध समान कर्जव्यवस्थेसाठी एक विशिष्ट कार्यपद्धति धोरणपत्रकानें दर्शविली. मध्यवर्ती पतसंस्थांकडून संलग्न सोसायट्यांना मिळणाऱ्या द्रव्य-साहाय्यावर कोणतेंहि बंधन लादण्याचा ह्या पत्रकाचा विचार नव्हता.

खालील लोक शेतकी–कर्जास पात्र आहेत असें धोरण पत्रकानें दर्शविलें :

(१) मालकीच्या जमिनी असणारे. (२) मालक किंवा कुळें म्हणून शेतजमिनी करणारे, मग त्या जमिनी मर्यादित मुदतीनें कसायच्या असोत, गहाण असोत वा निर्वाहाकरितां दिलेल्या असोत. (३) काढलेलें पीक किंवा तें विकून आलेला पैसा घेण्याचा कायदेशीर अधिकार असणारे.

सभासदाला कर्जपात्र ठरविणारे शेतजमिनीच्या क्षेत्रफळावरील निर्बंध बुद्धिपुरस्सर टाळण्यांत आले; मग त्या जमिनी आर्थिक दृष्ट्या फायद्याच्या असोत वा नसोत, शेतकऱ्याच्या पिकाचें एकंदर उत्पन्न कर्जफेडीला लागणाऱ्या रकमेहून अधिक आहे एवढेंच कर्जपात्रतेचें तत्त्व धोरण–पत्रकांत अभिप्रेत असल्यामुळें त्या पत्रकानें कर्जपात्रतेचें फक्त सर्वसाधारण वर्णन केलें. धोरण–पत्रकांत सरकारी कर्जाचे दोन वेगळे प्रकार प्रथमतःच करण्यांत आले :

(१) वार्षिक शेतकी कामाकरितां लागणारें (व म्हणून वर्षातल्या पिकाच्याच उत्पन्नानें फेडावयाचें) कर्ज, (२) बैल आउतें, विहिरींच्या दुरुस्त्या, ताली वगैरेंसाठी लागणारें मध्यम मुदतीचें व तीन वर्षांत फेडावयाचें कर्ज.

पीक काढण्याच्या गरजा लक्षांत घेऊन सभासदांच्या कर्ज-पात्रतेची सांगड त्यांच्या उत्पादनाशीं घालण्याचें तत्त्व धोरण–पत्रकानें दर्शविलें. कर्जदानाचा संबंध मालमत्तेशीं जोडण्याऐवजीं तो उत्पादनाशीं जोडला. मध्यम मुदतीच्या कर्जाबाबत मात्र, मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्याच्या २४ (अ) (अ) कलमान्वयें जाहीर केलेली मालमत्ता हीच कर्जाचें तारण म्हणून ठरविली गेली. मालमत्तेच्या तारणापेक्षा उत्पादनाच्या तारणावर दिलेला भर म्हणजे जुनी वार्षिक कर्जपद्धति गेल्यानें झालेली सुधारणाच होय. प्रत्येक पिकाच्या उत्पादनासंबंधींच्या गरजांवर व दर एकरीं पिकावर नवीन पद्धति आधारलेली होती; त्यामुळें ती अधिक प्रमाणांत लवचिक असे, व तिची मदत सढळ होत असते. विशिष्ट उद्दिष्टांसाठीच कर्जे व पिकाच्या कापणीनंतर त्यांची परतफेड, हे नव्या पद्धतीचे महत्त्वाचे गुण होते.

ऋणकोनीं काढलेल्या निरनिराळ्या पिकांच्या दर एकरीं उत्पन्नावर कर्जसाहाय्याची रक्कम अवलंबून होती. वेगवेगळ्या टापूंतील पत-संस्थांनीं सोसायट्यांच्या प्रतिनिधींच्या सूचनांनुसार कर्जाचें प्रमाण पिकांच्या दर एकरीं उत्पन्नाप्रमाणें निर्णीत केलें. पिकासाठी ठराविक जमीन कसत असल्यामुळें जर एखादा सभासद कर्जपात्र ठरला तर ठराविक प्रमाणांत त्याला कर्ज मिळालेंच पाहिजे. कुळांनादेखील, पिकांचें तारण गृहीत धरल्यामुळें कर्जे मिळणें शक्य झालें पाहिजे, ह्या गोष्टीला नवीन पद्धतीनें कायदेशीर आधार दिला.

### समितीचा निष्कर्ष

"पतपुरवठा पुरेसा असणें, उत्पादनासाठी कर्जाचा उपयोग होणें, सहकारी संस्थेच्या द्वारें पिकाची विक्री व कर्जाची वसुली होणें आणि हीं सर्व कामें परस्परसंयोगानें व कार्यक्षमतेनें व्हावींत म्हणून एक संघटना उभारणें—या सर्व गोष्टींची पीक–कर्जव्यवस्थेच्या यशस्वितेला आवश्यकता आहे. उत्तम पिकें काढण्यासाठी व त्यांची अधिक किफायतशीरपणें विक्री करण्यासाठी सभासदांना ती पत–व्यवस्था पैसा पुरवीत असेल तर ती यशस्वी झाली असें म्हणणें रास्त होईल. राज्य सहकारी–बँक आणि मध्यवर्ती पतसंस्था काम करीत असलेल्या कांहीं निवडक ठिकाणीं पत–पुरवठा–व्यवस्थेला यश लाभलेलें आहे. मुबलक प्रमाणांत कर्ज दिलें जात असल्याचें व सहकारी विक्रीवर भर दिला जात असल्याचें तिथें दिसून येत आहे. परंतु जवळ जवळ सबंध राज्यांत या बाबतींत कसाबसा मोडकातोडका प्रयत्न होत असल्याचें चित्र सध्यां दिसत आहे.

राज्य–सहकारी–बँकेच्या अर्थ–व्यवहारांचें प्रमाण, त्यांचे प्रकार आणि रक्कम पाहतां तिच्या जबाबदाऱ्या वेगानें वाढत्या आहेत. त्यांची अधिक वाढ होणेंहि संभवनीय आहे. राज्य–सहकारी–बँक सहकारी पतपुरवठाव्यवस्थेच्या उच्चतम पातळीवर आहे, पण प्राथमिक सोसायट्यांमध्यें त्या व्यवस्थेचा पाया रोवलेला आहे; व तोच भक्कम केला पाहिजे.

"या उपक्रमांत आणि यासारख्या जमीन श्रम यांचा कार्य-क्षमतेनें उपयोग करण्याच्या इतर उपक्रमांत भाग घेण्यासाठी जरूर असलेल्या साधनांचा अभाव शेतकऱ्यांना जाणवूं नये, म्हणून प्राथमिक सोसायट्यांपासून सर्वोच्च बँकेपर्यंत सहकारी संस्थांची आर्थिक स्थिति चांगली असली पाहिजे."

## स्वयंपूर्ण आर्थिक रचना म्हणजे नव्या प्रकारचें स्वदेशीचें व्रत

गेल्या दहा वर्षांत भारतानें औद्योगिक क्षेत्रांत अत्यंत स्पृहणीय अशी प्रगति केली आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उद्योगधंद्यांवर १०९४ कोटी रुपये खर्च होण्याची अपेक्षा होती; परंतु प्रत्यक्षांत हा आंकडा त्यापेक्षा किती तरी जास्त झाला आहे. सरकारी तसेंच खाजगी क्षेत्रांतील उद्योगधंद्यांची परिस्थिति पाहतां तिसऱ्या योजनेंत एकूण १४५० कोटी रु. भांडवल गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. हा आंकडा दुसऱ्या योजनेंतील अंदाजापेक्षा सुमारें ३२ टक्क्यांनीं जास्त आहे.

### पांच वर्षांतील प्रगति

विशेषतः गेल्या पांच वर्षांत भारतांत सर्वत्र छोट्या उद्योगधंद्यांचा एक नवीनच वर्ग उदयास येऊन सर्व प्रकारच्या औद्योगिक उत्पादनास जी जोरानें चालना मिळाली आहे तिचा विचार करूं पाहतां आपल्या देशाच्या औद्योगिक प्रगतीसाठी पुढें आलेल्या नव्या शक्तीची साक्ष पटते. आपली अर्थरचना स्वयंपूर्ण होण्याच्या दिशेनें अजूनहि बरीच कामगिरी करावयाची आहे हें खरें असलें तरी तो दिवस फार दूर नाहीं. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांतील औद्योगिक कार्यक्रम आंखतांना या सर्व गोष्टी विचारांत घेण्यांत आल्या आहेत.

### आपल्यापुढील प्रश्न

आपल्या देशापुढें अनेक गुंतागुंतीचे असे आर्थिक व सामाजिक प्रश्न आहेत. आपली लोकसंख्या प्रतिवर्षीं सुमारें २ टक्क्यांनीं वाढत आहे; औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या देशांच्या मानानें शिक्षण, समाजसेवा, तांत्रिक प्रगति, इत्यादि क्षेत्रांत आपण अजूनहि बरेच मागें आहोंत. यावरून आपल्यापुढें किती बिकट कामगिरी आहे त्याची कल्पना येईल. त्याचबरोबर आपले आर्थिक प्रश्न धडाडीनें व निर्धारानें सोडविण्याची किती निकड आहे तेंहि यावरून स्पष्ट होतें.

आपलें राष्ट्रीय उत्पन्न १९७०–७१ पर्यंत व दरडोई उत्पन्न १९७५–७६ पर्यंत दुप्पटीनें वाढविण्याचें उद्दिष्ट दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ठरविण्यांत आलें आहे. तसेंच स्वयंपूर्ण अर्थ रचनेचें उद्दिष्ट साध्य करण्यासाठी तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील संकल्पित भांडवल गुंतवणूक पूर्ण करणेंच नव्हे तर या योजनेच्या मसुद्यांतील औद्योगिक कार्यक्रमापेक्षाहि अधिक महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हातीं घेणें आवश्यक आहे.

### अर्थरचनेच्या गरजा समतोल ठेवण्याची आवश्यकता

पंचवार्षिक योजना आंखतांना राष्ट्रीय अर्थरचनेच्या निरनिराळ्या क्षेत्रांच्या गरजांचा समतोल विचार करणें आवश्यक असतें. परदेशांतील व देशांतर्गत अशी आपली साधनसंपत्ति अमाप नाहीं. झपाट्यानें आर्थिक व औद्योगिक विकास करण्यामागील अंगभूत निकडीच्या बाबी यांकडे लोकशाही आधिष्ठित नियोजनांत दुर्लक्ष करून चालणार नाहीं.

### चैनीच्या वस्तूंवर निर्बंध अटळ

राष्ट्रीय उत्पन्न आणि बेकारीचा प्रश्न सोडविण्याबाबतचीं आपलीं दीर्घ मुदतीचीं उद्दिष्टें साध्य करावयाचीं झाल्यास त्याचप्रमाणें नजीकच्या भविष्यकाळांत स्वावलंबी अर्थरचना निर्माण करावयाची झाल्यास मूलभूत तसेंच भांडवली उद्योगधंद्यांत, विशेषतः यंत्रउभारणीच्या कार्यक्रमांत अधिक प्रमाणांत भांडवल गुंतवणूक झाली पाहिजे. त्याचबरोबर उद्योगधंद्यांतील तंत्रें, बारकावे इ. गोष्टींहि साध्य करून घेतल्या पाहिजेत. भांडवली माल तयार करणाऱ्या तसेंच इतर माल तयार करणाऱ्या उद्योगधंद्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ करतांना कांहीं अडचणी भासणें साहजीक आहे. त्या कमी करण्यासाठी व राष्ट्रीय उत्पन्न वाढल्यामुळें ग्राहकोपयोगी मालासाठी होणारी मागणी पूर्ण करण्याकरितां या योजनेंत अनेक प्रकारच्या ग्राहकोपयोगी व इतर अत्यावश्यक मालाचें उत्पादन करणाऱ्या उद्योगधंद्यांची तरतूद करण्यांत आली आहे. तथापि या सर्व मागण्या संपूर्णपणें फलद्रूप करणें शक्य होणार नाहीं व कांहीं प्रमाणांत ग्राहकोपयोगी मालाच्या, विशेषतः चैनीच्या व तत्सम वस्तूंच्या वापरावर निर्बंध घालणें अटळ होईल. तिसऱ्या योजनेंत संकल्पिलेल्या उद्योगधंद्यांतील लक्ष्यें पार पाडण्यासाठी त्यांतील निरनिराळ्या क्षेत्रांत सुसूत्रता आणणें अत्यावश्यक असून त्यांच्या प्रगतीकडे सतत लक्ष देणें जरूर आहे.

### शेतकी विकासाला अग्रक्रम

तिसऱ्या योजनेंत शेतकी विकासाला अग्रक्रम देण्यांत आला आहे. तथापि विशिष्ट अवस्थेनंतर शेतकीचा अधिक विकास उद्योगधंद्यांच्या प्रगतीवरच अवलंबून आहे ही गोष्ट मान्य करण्यांत आली आहे. ही गोष्ट लक्षांत घेऊनच उद्योगधंदे व खनिजद्रव्यें यांसाठी सदर योजनेंत १५००कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. तिसऱ्या योजनेंतील उद्योगधंद्यांच्या विकासांत खत धंद्याच्या विकासाकडे विशेष लक्ष दिलें जाईल, देशी खतांच्या आजच्या उत्पादनाशीं तुलना करतां तिसऱ्या योजनेंत १९६५–६६पर्यंत खत-उत्पादन शक्तींत ५०० टक्क्यांनीं वाढ करण्याचा विचार असून त्यासाठी २०० कोटी रु. खर्च होतील. दुसऱ्या योजनेंत ज्याप्रमाणें पोलादधंद्यास विशेष प्राधान्य देण्यांत आलें त्याप्रमाणें तिसऱ्या योजनेंत यंत्रउभारणी धंद्याकडे खास लक्ष देण्यांत येईल. अवजड यंत्रसामग्री, खाणींसाठी लागणारी यंत्रसामग्री, हेवी इलेक्ट्रिकल्स, फाउंड्री फोर्ज, मशीन टूल्स व प्रिसिजन इन्स्ट्रुमेंटस यांच्या उत्पादनासाठी आंखलेल्या योजनांकरितां परदेशांकडून कर्जाची हमी मिळाली आहे ही एक समाधानाची बाब आहे. नियोजन मंडळानें मिश्रधातु व पोलाद-उत्पादनासहि विशेष महत्त्व दिलें आहे. खाजगी क्षेत्राचा विचार करतां सिमेंट, कागद व साखर कारखान्यांत लागणाऱ्या यंत्रसामग्रीच्या उत्पादनाकडे लक्ष देण्यांत येईल. तसेंच मध्यम व छोटीं अवजारें व यंत्रांच्या उत्पादनाची जबाबदारी खाजगी क्षेत्रावर आहे. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत आंखलेल्या या योजना पूर्ण झाल्यास भारत स्वयंपूर्णतेच्या दिशेनें बरीच वाटचाल करण्याची अपेक्षा आहे.

यंत्रनिर्मिति आणि इतर उद्योगधंद्यांसाठी पोलाद अत्यावश्यक वस्तु आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत पोलाद धंद्याचा पाया घालण्यांत आला. आतां या कारखान्यांची उत्पादनशक्ति वाढवून १ कोटी टन करण्यांत येईल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस तर पोलादाची मागणी बरीच वाढणार असून ती कशी भागवावी असा प्रश्न समोर उभा राहील.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंतील यंत्रनिर्मितीच्या व रासायनिक उद्योगधंद्यांच्या संकल्पित विकासामुळें स्वयंपूर्ण आर्थिक रचनेचा पाया घातला जाईल आणि तसें झालें म्हणजे भारतांतील विकासाचा वेग अतिशय वाढेल. तिसऱ्या योजनेंतील औद्योगिक विकासाच्या योजनेंतील अनेक उणीवांची सरकारला पूर्ण कल्पना आहे, तथापि सदर योजनेंतील विविध योजना अंमलांत आल्या व उत्पादन सुरू झालें कीं भारताचा झपाट्यानें विकास होऊं लागेल. वीज उत्पादन परिस्थिति आणि खनिजांचा उपयोग यासंबंधांतील उणीवांची भारत सरकार आणि नियोजन मंडळ यांस पूर्ण कल्पना

आहे. संकल्पित योजनांमुळें या क्षेत्रांत बरीच आघाडी मारतां येईल. परंतु आणखी कांहीं काळ आर्थिक दृष्ट्या ताण सहन करावा लागेल.

पुढील पांच ते दहा वर्षे देशाला अनेक अडचणी आणि आपत्ती सोसाव्या लागतील. अनेक प्रकारची गैरसोय होईल पण झपाट्यानें आर्थिक विकास साधण्याच्या कोणत्याहि योजनेंत त्यावांचून तरणोपाय नसतो. महान् राष्ट्रांनीं उज्वल भवितव्याच्या आकांक्षा बाळगून त्याग केला आणि अनेक गैरसोयी सोसलेल्या आहेत. आपल्या मुलाबाळांना सोन्याचे दिवस यावेत यासाठी सध्यांची पिढीहि त्यागास सिद्ध असून नियोजनबद्ध विकासाचें ओझें सहन करण्यास तयार आहे याबद्दल खात्री वाटते.

आपल्या देशानें स्वातंत्र्याच्या लढ्यांत महान् त्याग केलेला आहे. स्वदेशीचें व्रत त्या महान् राष्ट्रीय आंदोलनाचा पाया होता. स्वयंपूर्ण आर्थिक रचनेची कल्पना म्हणजे आजच्या परिस्थितींत कांहीं बाबतींत ह्याच व्रताची कल्पना आहे. भारतानें हें व्रत पन्नास वर्षांहून अधिक काळ एक ध्येय म्हणून आपल्यासमोर ठेवलेलें आहे. परदेशी मालाची जागा देशी मालानें घ्यावी अशी महात्माजींची मनीषा होती. आज आपण भारतांत कित्येक प्रकारच्या जीवनोपयोगी वस्तूंचें उत्पादन करतों इतकेंच नव्हे, तर त्यासाठी लागणारीं यंत्रेंहि देशांतच तयार करतों. आपल्याच भांडवलाच्या बळावर आपण पोलाद, तसेंच विविध प्रकारचा औद्योगिक कच्चा माल आपल्याच देशांत तयार करण्याची आपली आकांक्षा आहे.

### बँक ऑफ पूना लि. च्या बाजूनें हायकोर्टांत निवाडा

बँक ऑफ पूना लि. पुणें यांनीं बँकेचे माजी डायरेक्टर, श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी व त्यांचे बंधू श्री. रामनाथ श्रीराम सोमाणी यांच्याविरुद्ध बँकेकडून प्रॉमिसरी नोटीवरून कर्जाऊ घेतलेले रकमेवरून अनुक्रमें रु. १,०९,००० व रु. २२,००० वसूल करून मिळण्याकरतां पुणें सिव्हिल कोर्टांत दोन दावे लावले होते. ते दावे पुणें सिव्हिल जज्ज ( सि. डी. ) श्री. जे. एस. गुंजाळ यांनीं सन १९५५ सालीं खर्चासह रद्द केले होते. त्यावर बँक ऑफ पूना लि. यांनीं नामदार मुंबई हायकोर्टांत अनुक्रमें फर्स्ट अपील नंबर ८१९ व ८२०।१९५५ चीं अपिलें केलीं होतीं. तीं अपिलें न्यायमूर्ति पटेल व न्यायमूर्ति पटवर्धन यांचे डिव्हिजन बेंचपुढें सुनावणीस निघून दिनांक ११ ऑगस्ट, १९६० रोजीं न्यायमूर्तींनीं खालील कोर्टानें केलेले निकाल संपूर्णपणें रद्द केले व बँकेचा दोन्ही कोर्टांतील खर्च व बँकेनें मागणी केल्याप्रमाणें रक्कम पुढील व्याजासह देण्याचा हुकूम केला आहे.

सदरील कामांत सोमाणी यांची तक्रार अशी होती कीं, दाव्यांतील बँकेस लिहून दिलेल्या प्रॉमिसरी नोटा या बिन-भरणाच्या होत्या. सदरील तक्रार खालील कोर्टानें ग्राह्य धरली होती; परंतु वरील न्यायमूर्तींनीं सदर तक्रारींत कांहीं तथ्य नाहीं, असें धरून बँकेस संपूर्ण रकमेचे हुकुमनामे बहाल केले आहेत.

### आर्थिक विषयाचीं दोन दैनिकें सुरू होणार

'टाइम्स ऑफ इंडिया' गटातर्फे केवळ आर्थिक विषयास वाहिलेलें १२ पानी दैनिक १ एप्रिल, १९६१ पासून मुंबई येथें सुरू होईल. त्याची किंमत २५ नये पैसे राहील आणि तें सोमवार खेरीज बाकीच्या दिवशीं प्रसिद्ध होईल. 'एक्सप्रेस' गटातर्फेहि एक आर्थिक दैनिक मुंबई येथें सुरू होणार आहे. त्याचें नांव फिनॅन्शिअल एक्सप्रेस असें राहील. त्याचा इतर तपशील अद्याप प्रसिद्ध झालेला नाहीं.

### हिंदी बँकांच्या परदेशांतील कचेऱ्या

| देश | १९५५ | १९५६ | १९५७ | १९५८ | १९५९ |
|---|---|---|---|---|---|
| एडन | १ | १ | १ | १ | १ |
| ब्रि. पू. आफ्रिका | ८ | ९ | ९ | ९ | १३ |
| बर्मा | ९ | ९ | ९ | ९ | ७ |
| सिलोन | ३ | ३ | ३ | ३ | ३ |
| हाँगकाँग | २ | २ | २ | २ | ३ |
| जपान | २ | २ | २ | २ | २ |
| मलाया | १२ | १३ | १४ | ११ | ११ |
| पाकिस्तान | ६४ | ५६ | ५५ | ५४ | ४८ |
| सिंगापूर | — | — | — | ४ | ५ |
| थाइलंड | १ | १ | १ | १ | १ |
| ग्रेटब्रिटन | ४ | ४ | ५ | ५ | ५ |
| एकूण | १०६ | १०० | १०१ | १०१ | ९९ |

फक्त पाकिस्तानांतच बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या आहेत; इतर देशांत फक्त शेड्यूल्ड बँकांच्याच कचेऱ्या आहेत. पाकिस्तानांत १९५५ मध्यें ७, १९५६ मध्यें ६, १९५७ मध्यें ५, १९५८ मध्यें ४ व १९५९ मध्यें ३ अशा बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्या होत्या.


'अर्थ' ग्रन्थमाला

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली ४ सहकार





## बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची हरिहर शाखा


### सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें उद्‌घाटन

१५ ऑगस्ट रोजीं, स्वातंत्र्यदिनाचे सुमुहूर्तावर, बँक ऑफ महाराष्ट्र लि. ची हरिहर येथील शाखा पुणें-बंगलोर रस्त्यावरील नव्या प्रशस्त जागेंत नेण्यांत आली आणि त्याच दिवशीं सेफ-डिपॉझिट व्हॉल्टहि सुरू करण्यांत आला. उद्‌घाटन बँकेचे चेअरमन, श्री. वा. पुं. वर्दे, ह्यांच्या हस्तें झालें. समारंभास बँकेचे डायरेक्टर रा. ब. एम्. बी. जांभेकर, म्हैसूर किर्लोस्कर लि. चे जनरल मॅनेजर श्री. आर. एल्. किर्लोस्कर, बँकेचे मॅनेजर श्री. सी. व्ही. जोग, हे उपस्थित होते. त्याचप्रमाणें सुमारें ५०० प्रतिष्ठित नागरिकहि समारंभास आले होते.

## दि पूना मर्चंटस को. बँक लि.

अहवालाचे वर्षी बँकेच्या वसूल भांडवलांत ३७,६४० रु. ची वाढ होऊन तें १,८८,७८० रु. झालें. रिझर्व्ह व इतर फंड्स १,५३,५७१ रु. चे आहेत. ठेवींत १,७२,९८० रु. वाढ होऊन त्यांची रक्कम १०,७४,६०५ रु. झाली. येणें कर्जात दीड लक्ष रु. ची वाढ होऊन तें ७½ लक्ष रु. झाले. सरकारी व इतर रोख्यांत ३,५८,८१२रु. गुंतविलेले आहेत. अहवालाचे वर्षी बँकेस १२,००६ रु. नफा झाला. ४% डिव्हिडंडसाठी ७,२०० रु. चा विनियोग केला जाईल. श्री. ल. गो. गोसावी हे बँकेचे चेअरमन असून श्री. भ. ग. साबणे हे एजंट आहेत.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तीत जास्त उसाचे गाळण करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स, गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतीव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षे बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी ( द. सातारा )

महाराष्ट्रांतील लहानमोठ्या उद्योगधंद्यांची आर्थिक अडचण तत्परतेनें दूर करून
महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास संपूर्ण साह्य करणारी

( शिड्यूल्ड बँक ) **दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि. पुणें** ( स्थापना १९३६ )

मुख्य ऑफिस :—प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २. ( फोन नं. ६५६३ )
मुंबई शाखा :—८१ मेडोज स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १. ( फोन नं. २५३४०८ )

: संचालक मंडळ :

श्री. छोटालाल धरमसी जोशी ( प्रोप्रायटर–कमलाकांत छोटालाल अँड को. ( इम्पोर्टर्स, एक्सपोर्टर्स मुंबई ) अध्यक्ष.
श्री. गणेश उद्धव चितळे ( सुपरिंटेंडेंट, पैसाफंड कांच कारखाना ) उपाध्यक्ष.
श्री. गणेश रामचंद्र साठे ( डायरेक्टर, साठे बिस्किट अँड चाकोलेट कं. लि. पुणें )
श्री. चिंतामण त्रिंबक चितळे ( ऑ. सेक्रेटरी, पैसाफंड ग्लास वर्क्स, तळेगांव )
श्री. वासुदेव पांडुरंग वैद्य ( इलेक्ट्रिकल व मेकॅनिकल इंजिनियर )
श्री. विनयकुमार नारायण सरदेसाई ( मॅ. डायरेक्टर, एशियाटिक इंडस्ट्रिअल एजन्सीज लि. मुंबई )
श्री. सदाशिव कृष्णाजी भागवत ( प्रोप्रायटर, राम एजन्सी ) पुणें.
श्री. मोहनलाल हंसराज लुनावत ( व्यापारी ) पुणें.

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. ★
मुदत ठेवींवरील आकर्षक व्याजाच्या नवीन योजनेबाबत समक्ष भेटा.

—वी. वाय्. पाठक, जॅ. मॅनेजर.

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, लक्ष्मी रोड, पुणें २.

पोस्ट बॉक्स : ५११. ★ टेलिफोन : १४८३.

## सूचना

दि. १ जुलै, १९५७ पासून बँकेनें सेव्हिंग्ज ठेवी-वरील व्याजाचा दर दीड टक्क्यांवरून द. सा. द. शें. दोन टक्के असा केला आहे.

कायम ठेवी खालील दरानें स्वीकारल्या जातील.

| मुदत | : | व्याजाचा दर |
|---|---|---|
| १ वर्ष | : | २½ टक्के |
| २ वर्षं | : | २¾ टक्के |
| ३ वर्षं | : | ३ टक्के |
| ५ वर्षं | : | ३½ टक्के |
| १० वर्षं | : | ४ टक्के |

अल्प मुदतीच्या ठेवींच्या दरासंबंधीं माहिती बँकेच्या पुणें मुख्य कचेरींत पत्रानें अगर समक्ष मिळूं शकेल.

पुणें २.
ता. ३१-७-५७

वा. ग. आळतेकर
कार्यकारी संचालक



# बँक ऑफ पूना, लिमिटेड

( शेडयूल्ड बँक )

| | | |
|---|---|---|
| अधिकृत मांडवल | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें मांडवल | | रु. १५,००,००० |
| वसूल मांडवल | ... | रु. १२,५०,००० |

—: संचालक मंडळ :—

१. श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, चेअरमन
२. डॉ. ना. भि. परुळेकर, व्हाइस चेअरमन (संचालक, सकाळ)
३. श्री. फ्रामजी पी. पोचा
४. श्री. गणपतराव काळुराम नाईक, B. Sc., B. E., LL. B.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

अल्प मुदत ठेवीवर आकर्षक व्याज.

...शाखा...

पुणें (१) सदाशिव पेठ, (२) डेक्कन जिमखाना (३) सांगली.

हेड ऑफिस व सांगली शाखेत अल्प भाड्यांत लॉकरची सोय.

मुख्य ऑफिस :
४५५ रविवार पेठ, पुणें

गो. गं. साठे
मॅनेजर



नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

# दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव

( शेड्यूल्ड बँक )

स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्ये, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होम-सेव्हिंग्जचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येते.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर



स्थापना १९३६

# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस :

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७. लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण, १२. अकलूज.

| | | ३१ डिसेंबर, १९५९ |
|---|---|---|
| वसूल मांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,८८,९२,००० |
| एकूण खेळतें मांडवल | रु. | २,१७,२५,००० |

मुदत ठेवींवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·१५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | १·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | १·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.